# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**


जा.क्र. मनपा/नर/ ३५४९/२०१९-२० दिनांकः- २४/१०/२०१९

Bhd. (Legal) 1909

## // भाग भोगवटा दाखला //

प्रति,

1) मे. अर्बिडीज (सल्लागार अभियंता)
437, हिंद राजस्थान बिल्डींग
दादासाहेब फाळके रोड, दादर (पु.), मुंबई 400 014

2) मे. स्कायलार्क रिअलटर्स प्रा.लि. (विकासक)
401/402 विराज टॉवर्स, चौथा मजला,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मेट्रो स्टेशन जवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, अंधेरी (पूर्व), मुंबई - ९३.

विषय - मौजे घोडबंदर, स.क्र. 21/2अपै., 21/2बीपै., 22/2,5, 24/3, 25/1, 26/5,8(पै.),9, 110/1पै., 112/2पै., 113/2, 116/1,8,9, 117/1,3, 4,5,6, 118/2,3,4,5,7,8, 125/2,3,4,5,6,7, 126/1 ते 6, 127/1,3,5, 133/1,2,7, 134/2,3,5अ,8, 148/2, 113/1, 114/1,3,4,6, 132/3, 133/6,8, 20/8पै., 22/1बी, 22/1सी, 22/3, 110/2पै.,116/4,5,7, 124/2,3, 127/2, 128/5अ,5बपै., 133/5, 148/1 या जागेतील इमारत प्रकार 2अे, 2बी, 2सी व 2डी (स्टिल्ट + 2 पोडियम + 3 ते 23) व इमारत प्रकार 3अे, 3बी (पार्ट स्टिल्ट + 2 पोडियम + 3 ते 23) करिता As Built नकाशानुसार भाग भोगवटा दाखला मिळणेबाबत.

संदर्भ -
1) मे. अर्बिडीज (सल्लागार अभियंता) यांचा दि.21/09/2019 व दि.25/09/2019 रोजीचा अर्ज.
2) मे.सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील 10(3), 10(5) ची व दुर्बल घटक योजनेची कार्यवाही झालेली असल्याबाबत विकासकाने रु.500/- च्या स्टँम्प पेपरवर दिलेले दि.20/09/2019 रोजीचे शपथपत्र.
3) तहसिलदार सो., ठाणे यांचे कार्यालयाचे क्र.महसुल/क-1/जमिनबाब/रु.क/कावि-101/2018 दि.03/01/2018, क्र. महसुल/क-1/जमिनबाब/रु.क/कावि-12517/2017 दि.31/07/2017, पावती क्र. 128360, 1403305 अन्वये रुपांतरित कराचा भरणा पावती प्रत.
4) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील जा.क्र. मनपा/नर/1834/2017-18 दि.09/08/2017 अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.
5) मिरा भाईंदर महानगरपालिकेकडील जा.क्र. मनपा/नर/1229/2017-18 दि.26/06/2017 अन्वये जोत्याचा दाखला.
6) मे. अर्बिडीज (सल्लागार अभियंता) यांचेकडील (Building Completion Certificate) दि.20/09/2019 रोजीचा इमारत पुर्णत्वाचा दाखला.
7) स्ट्रक्चरल इंजिनिअर्स मे. जे + डब्लू यांचेकडील इमारतीचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असलेबाबतचा दि.09/07/2019 रोजीचा दाखला.
8) श्री. राकेश अे. पटेल यांचा दि.22/08/2019 रोजीचा प्लबींगबाबतचा दाखला.
9) महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. MFS/51/19/644 दि.03/10/2019 अन्वये अंतिम नाहरकत दाखला.
10) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पत्र क्र. मनपा/साबां/5928/2019-20, दि.20/09/2019 अन्वयेचा सोलार वॉटर हिटिंग सिस्टीम कार्यान्वित केल्याचा दाखला.
11) महानगरपालिकाचे रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पाची उभारणी केलेबाबतचे पाणीपुरवठा विभागाकडील पत्र क्र. मनपा/पापु/994/2019-20 दि.17/09/2019 अन्वयेचे प्रमाणपत्र.
12) विकासकाचे दि.20/09/2019 रोजीचे शपथपत्र.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र. मनपा/नर/ ३८५६/२०१९-२० दिनांक:- २८/१०/२०१९

Bhd. (Legal) 1909

महोदय,

विषयांकित जागेमधील रहिवास + वाणिज्य वापराच्या इमारत प्रकार 2अे, 2बी, 2सी व 2डी (स्टिल्ट + 2 पोडियम + 3 ते 23) (सल्लागार अभियंता प्रस्तावित - "Estella"), क्षेत्र 24050.83 चौ.मी. व इमारत प्रकार 3अे, 3बी (पार्ट स्टिल्ट + 2 पोडियम + 3 ते 23) (सल्लागार अभियंता प्रस्तावित - "Atria"), क्षेत्र 14599.54 चौ.मी. चे बांधकाम As Built नकाशाप्रमाणे सल्लागार अभियंता मे. अर्बिडीज (नोंदणी क्र. पत्र क्र. मनपा/नर/1996/2016-17, दि.26/07/2016 व दि.31/12/2019 पर्यंतची मुदतवाढ) यांनी सादर केलेल्या As Built नकाशाप्रमाणे व श्री. सिध्दिकी मोडक (साईट सुपरवाईजर) यांच्या देखरेखीखाली पुर्ण झालेले असून सदरचे बांधकाम तांत्रिकदृष्टया योग्य असल्याबाबत संरचना अभियंता मे. जे + डब्ल्यु व सदर इमारतीच्या प्लंबींगचे काम योग्य झालेबाबत परवानाधारक मे. राकेश अे. पटेल यांनी दाखला दिलेला आहे. यास्तव सदर वरीलप्रमाणे च्या इमारतीसाठी खालील अटीशर्तीच्या अधिन राहुन इमारतीसाठी As Built नकाशाप्रमाणे भाग भोगवटा दाखला देण्यात येत आहे.

अटीशर्ती -

1) संदर्भिय पत्र क्र. 4 अन्वयेच्या बांधकाम परवानगी / सुधारीत बांधकाम परवानगी मधील अटीशर्तीचे व विकासकाच्या संदर्भ क्र. 12 अन्वयेच्या शपथपत्राचे पालन करणे बंधनकारक राहिल.

जर

अ) मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आवश्यकता वाटल्यास कोणत्याही प्रकारची पुर्तता करणेस कळविल्यानंतर किंवा कोणताही प्रकारचा प्रतिबंध केल्यानंतर त्याचे पालन नाही केल्यास.

ब) आपण कोणत्याही प्रकारची माहिती लपवून किंवा चुकीची माहिती सादर करुन परवानगी / भोगवटा दाखला प्राप्त करुन घेतल्याचे मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची खात्री झालेनंतर सदरचा दाखला रद्द करणेचे अधिकार मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

2) सदर इमारतीच्या बांधकामामध्ये भविष्यात कोणत्याही प्रकारचे फेरबदल करावयाचे झाल्यास त्याबाबत महानगरपालिकेची परवानगी प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

3) सदरच्या दाखल्यामध्ये नमुद केलेल्या वापरा व्यतिरिक्त भविष्यात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास सदरचा दाखला रद्द समजणेत येवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

4) सदरच्या दाखल्यामुळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 मधील कोणत्याही तरतुदी अन्वयेच्या कार्यवाहीसाठी बाधा येणार नाही.

5) सदरच्या दाखल्यामुळे अर्जदारास त्यांच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही जमिनीचा कोणत्याही प्रकारे वापर करता येणार नाही.

6) सदर जागेच्या मालकीबाबतच्या मा. न्यायालयात सुरू असल्यास मा. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील. त्याबाबत महानगरपालिकेची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.

7) अर्जदारांनी सादर केलेल्या दि.20/09/2019 रोजीच्या शपथपत्राप्रमाणे मलनि:सारण व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्थाबाबत देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

8) सदर इमारतीचा वापर सुरु करणेपुर्वी सादर केलेल्या सर्व विभागाकडील नाहरकत दाखला / प्रमाणपत्र / परवानगी यामधील अटीशर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

9) संदर्भिय पत्र क्र. 12 मधील हमीपत्रांचे पालन करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

10) रेखांकनामधील वाहनतळाची जागा कायमस्वरुपी सार्वजनिक वापरासाठी खुली ठेवणे बंधनकारक राहिल.

२४/१०/१९

(बालाजी खतगांवकर)

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर.

प्रत - 1) कर संकलक व निर्धारक

2) विभाग प्रमुख, अतिक्रमण तथा अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग